# जाहीरात

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

### महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळ,

शासकीय तंत्र निकेतन इमारत ,क-विभाग ,४९,खेरवाडी,वांद्रे (पूर्व),मुबई-४०००५१.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षी करिता मंडळामार्फत राबविण्यात येत असलेले व्यवसाय अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यासाठी इच्छुक नोंदणीकृत संस्थांकडून/व्यवस्थापनांकडून तसेच या पूर्वी मान्यता दिलेल्या संस्थांकडूनonline अर्ज मागविण्याबाबतचा कार्यक्रम तपशील पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | बाब | अर्ज करण्याचा कालावधी | अर्ज कोणाकडे करावयाचा त्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम नव्याने सुरु करणे / अभ्यासक्रमांच्या तुकडीत वाढ करणे/ जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे / नुतनीकरण करणे/ अभ्यासक्रम / तुकडीस कायमस्वरूपी मान्यता (स्थायी सलग्नता) इ.करीता करावयाचा अर्ज. | १)नियमित शुल्कासह दिनांक २५/०१/२०२१ ते २५/०२/२०२१ २)विलंब शुल्कासह दिनांक २६/०२/२०२१ ते ०५/०३/२०२१. (शासकीय सुट्ट्या वगळून) | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे |

मान्यता मिळण्याबाबतची कार्यपद्धती,नियमावली आणि अटीं व शर्ती तसेच विविध व्यवसाय अभ्यासक्रम व विविध शुल्काबाबतची माहिती मंडळाच्या माहितीपुस्तीकात उपलब्ध करण्यात आलेली आहे.सदर अर्ज व माहितीपुस्तिका मंडळाच्या www.msbsde.edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

इच्छुक नोंदणीकृत संस्थांने/व्यवस्थापनांने online अर्ज भरून त्याची प्रिंट काढून परिपूर्ण माहिती भरलेला अर्ज व त्यासोबत आवश्यक ते कागदपत्रे,चलन(अर्ज रक्कम व प्रक्रिया शुल्क रक्कमेचे) इत्यादि संबंधित जिल्हातील संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे विहीत मुदतीत जमा करावयाचा आहे.मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा अथवा मंडळाच्या www.msbsde.edu.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार,ऑगस्ट२१,२०१३ मधील सन २०१३चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.प्रकरण दोन ३.(१)(२)नुसार अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आलेली आहे.त्यानुसार कोणतीही व्यक्ती किंवा शिक्षण संस्था,समुचित प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय व्यवसाय शिक्षण यामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणार नाही किंवा सुरु करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा चालविणार नाही याची तरतूद सदर अधिनियमत केलेली आहे.तरी अश्या संस्थांनी वर नमूद कालावधीत मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत अर्ज करून मंडळाचे अभ्यासक्रम अधिकृतपणे सुरु करू शकतात.

सही/-
(के.डी.शिंदे)
सचिव

## ६) मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यासाठी संस्थेने / व्यवस्थापनाने करावयाचे विविध प्रकारचे अर्ज, कार्यवाही कार्यक्रम, गोषवारा.

### शैक्षणिक वर्ष २०२१-२२

| अ.क्र. | | बाब | अर्ज करण्याचा कालावधी | अर्ज कोणाकडे करावयाचा त्याबाबतचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | अ. | मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम<br>१)नव्याने सुरु करणे.<br>२)अभ्यासक्रमांच्या तुकडीत वाढ करणे.<br>३) जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे यासाठी संस्थेच्या व्यवस्थापनाने करावयाचा अर्ज. | १)नियमित शुल्कासह दिनांक:- २५/१/ २०२१ ते २५/०२/२०२१.<br>२)विलंब शुल्कासह दिनांक:- २६/०२/२०२१ ते ०५/०३/२०२१.<br>(शासकीय सुट्ट्या वगळून) | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे |
| | ब. | मंडळाकडून अभ्यासक्रम चालविण्यासाठी संस्थेस मंडळामार्फत **तात्पुरती मान्यता आदेश** (Letter of Intent) देण्याचा सर्वसाधारण कालावधी | दि.०५ एप्रिल,२०२१ पर्यंत | **तात्पुरती मान्यता आदेश** (Letter of Intent) मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील. |
| | क. | उपरोक्त अ.क्र.१ मध्ये नमूद केलेल्या ज्या संस्थांना **तात्पुरती मान्यता आदेश** (Letter of Intent) देण्यांत येईल, त्या संस्थांनी तात्पुरत्या मान्यता आदेशात दिलेल्या अटींनुसार संबंधित अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची पूर्तता केल्यानंतर करावयाचा अर्ज. | दि.४ मे,२०२१ पर्यंत | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे |
| | ड. | ज्या संस्था पायाभूत सुविधा पुर्ततेबाबतचा अर्ज विहीत मुदतीत सादर करतील अशा संस्थांचे निरीक्षण करावयाचा सर्वसाधारण कालावधी | दि.२४ मे,२०२१ पर्यंत | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे |
| | इ. | ज्या संस्था अभ्यासक्रमास आवश्यक असलेल्या विविध बाबींची मानकानुसार पुर्तता करीत असतील त्या संस्थांना विद्यार्थी प्रवेशासाठी मान्यता देण्याचा सर्वसाधारण कालावधी. | दि.३० जून,२०२१ पर्यंत | विद्यार्थी प्रवेश मान्यतेचे आदेश मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | अ. | मंडळाने यापूर्वी मागीलवर्षी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमास संबंधित व्यवस्थापनाने प्रत्येक वर्षानंतर नुतनीकरणासाठी करावयाचा अर्ज. | १)नियमित शुल्कासह दिनांक :- २५ / ०१ / २०२१ ते २५ /०२ / २०२१.<br>२)विलंब शुल्कासह दिनांक:- २६/०२/२०२१ ते ०५/०३/२०२१.<br>**(शासकीय सुट्ट्या वगळून)** | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | ब. | नुतनीकरणासाठी अर्ज केलेल्या संस्थांचे प्रस्ताव पडताळणी करण्याचा सर्वसाधारण कालावधी | दि.०५ एप्रिल,२०२१ पर्यंत | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | क. | विहित अटींची पुर्तता करणा-या संबंधित संस्थांतील अभ्यासक्रमांना मंडळामार्फत नुतनीकरण मान्यता प्रदान करणे. | दि.२५ जून,२०२१ पर्यंत | नुतनीकरण मान्यतेचे आदेश मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील. |
| ३ | अ. | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांसाठी तात्पुरती मान्यता पुढे चालू ठेवण्यासाठी (स्थायी संलग्नता) संस्थेच्या व्यवस्थापनाने करावयाचा अर्ज. | १)नियमित शुल्कासह दिनांक:- २५ / ०१ / २०२१ ते २५ /०२ / २०२१.<br>२)विलंब शुल्कासह दिनांक:- २६/०२/२०२१ ते ०५/०३/२०२१.<br>**(शासकीय सुट्ट्या वगळून)** | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | ब. | स्थायी संलग्नतेसाठी अर्ज केलेल्या संस्थांचे निरीक्षण करण्याचा सर्वसाधारण कालावधी | दि.२५ एप्रिल,२०२१ पर्यंत | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | क. | विहित अटींची पुर्तता करणा-या संबंधित संस्थांतील अभ्यासक्रमांना मंडळामार्फत स्थायी संलग्नता मान्यता प्रदान करणे. | दि.३०जून,२०२१ पर्यंत | स्थायी संलग्न्ता मान्यतेचे आदेश मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील. |
| ४ | अ. | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले अभ्यासक्रम नविन जागेत स्थलांतरीत करण्यासाठी संस्थेच्या व्यवस्थापनाने करावयाचा अर्ज. | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | ब. | जागा स्थलांतरणासाठी अर्ज केलेल्या संस्थांचे निरीक्षण करण्याचा सर्वसाधारण कालावधी | अर्ज केल्याच्या दिनांकापासून पुढील ३० दिवसांपर्यंत | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | क. | विहित अटींची पुर्तता करणा-या संबंधित संस्थांतील अभ्यासक्रमांना मंडळामार्फत स्थ्लांतरणासाठी मान्यता प्रदान करणे. | प्रादेशिक कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० दिवसांत. | जागा स्थ्लांतर मान्यतेचे आदेश मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील. |
| ५ | अ. | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले अभ्यासक्रम / संस्था बंद करणे. | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय . |
| | ब. | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले अभ्यासक्रम / संस्था बंद | प्रादेशिक कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० दिवसांत. | अभ्यासक्रम / संस्था बंद करणेबाबत मान्यतेचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | करणेबाबत मंडळामार्फत मान्यता प्रदान करणे. | | आदेश मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील. |
| ६ | अ. | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेल्या संस्थेच्यां नांवात बदल करणे | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | ब. | संस्थेच्या नांवात बदल करणेबाबत मंडळामार्फत मान्यता प्रदान करणे. | प्रादेशिक कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० दिवसांत. | संस्थेच्या नांवात बदल करणेबाबत मान्यतेचे आदेश मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील.येतील. |
| ७ | अ. | व्यवस्थापन समितीत बदल करणे. | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधित जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय. |
| | ब. | व्यवस्थापन समितीत बदल करणेबाबत मंडळामार्फत मान्यता प्रदान करणे. | प्रादेशिक कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० दिवसांत. | व्यवस्थापन समितीत बदल करणेबाबत मान्यतेचे आदेश मंडळाचे संकेतस्थळ www.msbsde.edu.in वर प्रकाशित करण्यात येतील. |

**महाराष्ट्र राज्य कौशल्य  विकास परीक्षा मंडळाचे मान्यताप्राप्त व्यवसाय अभ्यासक्रम नोंदणीकृत खाजगी संस्थांमध्ये कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावर सुरु करण्यासंबंधी  परवानगी देण्याबाबत अटीं व शर्ती तसेच कार्यपद्धती.**

**प्रस्तावना :**

औद्योगिकरणातील वाढ, बदलते तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल या बाबींचा विचार करता अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच विशिष्ट शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी (ॲड-ऑन कोर्सेस) कमी कालावधीचे व्यावसायिक अभ्यासक्रम तयार करुन अशा विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारास चालना (Employability) मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक असणा-या व्यवसाय शिक्षणाची गरज भागविण्यासाठी मंडळामार्फत रोजगार व स्वयंरोजगार या उद्दिष्ट् पूर्तीसाठी व्यवसायभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविण्यांत येतात.औद्योगिककरणातील वाढ,बदलते तंत्रज्ञान,सामाजिक व आर्थिक बदल इत्यादींमुळे मंडळाच्या अभ्यासक्रमांत कालानुरुप सुधारणा तसेच वाढ करुन सद्यस्थितीत मंडळामार्फत २८ गटातील ६महिने,१वर्ष,व २ वर्ष कालावधीचे अंशकालीन व पूर्णवेळ स्वरुपाचे असे अभ्यासक्रम राबविण्यांत येत आहेत.

मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम राज्यामध्ये जिल्हास्तरावर,तालुकास्तरावर,ग्रामीण भागात मंडळाने मान्यता दिलेल्या शासकीय/निमशासकीय/कायमस्वरूपी मान्यताप्राप्त संस्था व खाजगी संस्था अश्या एकूण १२४२ इतक्या संस्थांमध्ये राबविण्यात येत आहेत.सदरच्या अभ्यासक्रमांसाठी साधारणपणे प्रतिवर्षी ६० ते ७० हजार विद्यार्थी प्रवेशित होतात. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा मंडळामार्फत घेण्यांत येते आणि उत्तीर्ण उमेदवारांना शासनाच्या वतीने मंडळामार्फत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

**अ)व्यवसाय अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य कौशल्य  विकास परीक्षा मंडळाची तात्पुरती स्वरुपाची मान्यता देण्याची कार्यपद्धती.**

मंडळाने अभ्यासक्रम चालविण्यासाठी संस्थेने /व्यवस्थापनाने विविध बाबींसाठी करावयाचे अर्ज व सोबत जोडावयाची कागदपत्रे,विविध प्रकारचे शुल्क,मान्यता प्रक्रिया कार्यक्रम,अभ्यासक्रमांची गटनिहाय माहिती आणि इतर आवश्यक माहितीचा तपशील,नियमावली,अटी व शर्ती माहिती पुस्तिकेत उपलब्ध करण्यात आलेला आहेत.

१. व्यवसाय  अभ्यासक्रम राबविण्याकरिता इच्छुक संस्थांकडून खालील नमूद मान्यता प्रकारासाठी अर्ज मागविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणे.
    - नुतनीकरण करणे.(ज्या संस्थेतील अभ्यासक्रमांना व तुकडीना  मागील वर्षी मान्यता देण्यात आलेली आहे फक्त अश्या संस्था नुतनीकरणासाठी पात्र असतील )
    - जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे.

- जुन्या संस्थेत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाच्या तुकडीत वाढ करणे.
- मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी कायमस्वरूपी मान्यता प्राप्त करणे.
- मान्यताप्राप्त अभ्यासक्रम नवीन जागेत स्थलांतरीत करणे.

२. वरील नमूद मान्यतेकरीता इच्छुक असलेल्या संस्थांसाठी अर्ज व माहितीपुस्तिका मंडळाच्या संकेतस्थळावर (www.msbsde.edu.in ) उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्था सदरचा अर्ज भरून प्रिंट काढून प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिलेल्या मुदतीत सादर करील.
   - अर्ज रक्कम रुपये - ५००/-
   - मागणी केलेल्या अभ्यासक्रमासाठी ठरविण्यात आलेल्या प्रक्रिया शुल्क रक्कमेचा भरणा केलेल्या चलनाची प्रत.

   टीप:केवळ परिपूर्ण अर्जच जिल्हा कार्यालयाकडे स्वीकारण्यात येईल.अपूर्ण अर्ज नाकारण्यात येईल.

३. संस्थेकडून परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हे संस्थांचे प्राप्त अर्ज/प्रस्तावांची छाननी करून संस्थांचे निरीक्षण करण्याकरिता त्यांच्या अधिपत्याखाली समिती नेमण्यात येईल.

४. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी गठीत केलेल्या समितीकडून संस्थांचे निरीक्षण/तपासणी करण्यात येईल.

५. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्याकडून मंडळाने विहीत केलेल्या आवश्यक त्या सुविधा व क्षेत्रीय गरज याची पडताळणी करून प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रादेशिक कार्यालयामार्फत मंडळाकडे सादर करण्यात येईल.

६. कौशल्य विकास परीक्षा मंडळाकडे प्राप्त प्रस्तावांवर राज्यस्तरीय छाननी समिती पुढे विचार विनिमय होऊन विहीत निकषांची पूर्तता करणा-या व विहीत केलेल्या सोई-सुविधा उपलब्ध असणा-या संस्थांना कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर व भविष्यात शासनाकडून कोणतेही अनुदान न देण्याच्या अटीवर अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेश करण्यासाठी मान्यता दिली जाईल.

७. ज्या अर्जदार संस्था अर्ज केल्यानंतर आवश्यक त्या अटींची पूर्तता करीत असतील ,त्या संस्थांना मंडळामार्फत अभ्यासक्रम चालविण्यासाठी तात्पुरत्या मान्यतेचे आदेश (Letter of Intent )निर्गमित करण्यात येईल.आणि अश्या संस्थांनी तात्पुरत्या मान्यतेचे आदेश ((Letter of Intent) निर्गमित झाल्यानंतर संस्थेसाठी मंजूर अभ्यासक्रमांच्या मानकानुसार आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा (जसे यंत्र व साधनसामुग्री,जागा ,कर्मचारी वृंद व इतर सुविधा) एक महिन्यात आत उपलब्ध करणे आवश्यक आहे.सदरचे तात्पुरत्या मान्यतेचे आदेश ((Letter of Intent) दोन वर्षापर्यंत वैध राहतील.

८. मंडळामार्फत तात्पुरत्या मान्यतेचे आदेश (Letter of Intent)निर्गमित झाल्यानंतर,ज्या संस्था पायाभूत सुविधांची दिलेल्या मुदतीत पूर्तता करतील अशा संस्थांनी सुविधांची पूर्तता केलेली असल्याबाबतचे पत्र /अर्ज (माहितीपुस्तिकेतील नमुन्यानुसार) अनामत रक्कम संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर केल्यानंतर संस्थेने पूर्तता केलेल्या पायाभूत सुविधांची ((जसे यंत्र व साधनसामुग्री,जागा

,कर्मचारी वृंद व इतर सुविधा) तपासणी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडून नेमण्यात आलेल्या समितीमार्फत करण्यात येईल.

९. ज्या संस्थांना मंडळामार्फत अभ्यासक्रम चालविण्यासाठी तात्पुरती मान्यता (Letter of Intent) प्रदान करण्यात येईल ,अश्या संस्थांनी पायाभूत सुविधा पूर्तता करण्यात आल्याबाबतचा अर्ज सादर करतेवेळी त्यासोबत तालुका/जिल्हा/महानगर स्तरावरील संस्था तसेच अपंगासाठी चालविण्यात येणा-या संस्थाकडून माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे अनामत रक्कम ही मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये असलेल्या खाती जमा करण्यात येईल.

१०. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत नेमण्यात आलेल्या समितीमार्फत तपासणी करण्यात आलेल्या ज्या संस्था त्यांना मंजूर करण्यात आलेले अभ्यासक्रमाच्या मानकांनुसार सर्व पायाभूत सोई-सुविधांची पूर्तता करीत असतील अश्या संस्थांना मंडळाकडून विद्यार्थी प्रवेश मान्यता प्रदान करण्यात येईल.